# <u>प्रेसनोट</u>

दि.१७/१०/२०२१

## जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पुणेचे सदस्य तथा उपआयुक्तावर एक लाख नव्वद हजाराची लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३६६/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - नितिन चंद्रकांत ढगे, वय - ४० वर्षे, पद- उप आयुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पुणे. वर्ग -१ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८,००,०००/- (आठ लाख रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,९०,०००/- (एक लाख नव्वद हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक - १५/१०/२०२१<br>सापळा दिनांक व ठिकाण:- दिनांक - १६/१०/२०२१ रोजी रात्री ०९.४० वाजता वानवडी येथे आरोपी लोकसेवकाचे निवास्थानाजवळ.<br>यातील तक्रारदार यांचे पत्नीचे जात प्रमाणपत्र पडताळणी करून ते वैध करण्याकरीता आरोपी लोकसेवकाने सुरूवातीस आठ लाख रूपये लाचेची मागणी करून नंतर ३,००,०००/- रूपयांची लाच मागणी करून पडताळणी दरम्यान तडजोडीअंती २,००,०००/- रूपयांची लाच मागणी करून त्यापैकी १,९०,०००/- रूपये लाच स्वीकारल्यावर त्यास रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>सापळा कारवाईनंतर घेण्यात आलेल्या आरोपी लोकसेवकाच्या घरझडतीमध्ये रोख १ कोटी २८ लाख ४९ हजार रूपये, (१,२८,४९,०००/-), मालत्तांची कागदपत्रे इत्यादीसह दोन कोटी ८१ लाख ८९ हजार (२,८१,८९,०००/-) इतक्या किंमतीची मालमत्ता मिळून आलेली आहे.<br>ला. प्र. वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे पुढील तपास करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.